छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण
व मानव विकास संस्था, पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
बालचित्रवाणी इमारत, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४
Email ID : sarthipune@gmail.com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502

## डॉ. पंजाबराव देशमुख-सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती २०२४-२५ करिता पात्र फक्त पदवीत्तर-पदवी विद्यार्थ्यांकडुन अर्ज मागविणेसाठी जाहिरात

देशातील नामांकित २०० शैक्षणिक संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रवेशित "मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी – मराठा" प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून "डॉ. पंजाबराव देशमुख - सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती" या उपक्रमांतर्गत पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. शासन निर्णय ईबीसी-२०१७/प्र.क्र. ४०२/शिक्षण -१, दि.०८/११/२०१७ व शासन शुध्दीपत्रक क्र.: ईबीसी-२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण -१, दि. १९/०३/२०१८ शासन निर्णयांसोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद शैक्षणिक संस्थामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित लक्षित गटातील पात्र विद्यार्थ्यांना "डॉ. पंजाबराव देशमुख - सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती" प्रदान करण्याचा निर्णय सारथी संस्थेने घेतला आहे. ही योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून लागू करण्यात आली आहे. त्यानुसार देशातील नामांकित २०० शैक्षणिक संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रवेशित "मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी –मराठा" प्रवर्गातील विद्यार्थ्यांनकडून विहित नमुन्यात सर्व आवश्यक कागदपत्रासह अर्ज मागविण्यात आले होते. विस्तृत जाहिरात, योजनेचे निकष, अटी-शर्ती सारथी संस्थेच्या https://sarthi-maharashtragov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. काही मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थामध्ये २३ ऑक्टोंबर पर्यत **पदव्युत्तर पदवीची** प्रवेश प्रक्रिया चालू होती म्हणून **फक्त पदवीत्तर-पदवीचे** शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मागील जाहिरातीत भाग घेता आला नाही. अशा विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. **सदर जाहिरात फक्त पदवीत्तर-पदवी विद्यार्थ्यांकरिता आहे.**

संकेतस्थळावरील योजनेची लिंक : https://sarthi-maharashtragov.in/ > सूचना फलक > डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना सन २०२४ -२५ > Candidate Application Form>पहावी.

**ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख :३०/१२/२०२४**

**मूळ अर्ज व कागदपत्रे (Hardcopy) सारथी संस्थेस पाठविण्याची शेवटची तारीख : ३०/१२/२०२४**

टीप: सदर विषयी भविष्यात कोणतीही माहिती / सूचना उपरोक्त लिंक वरच दिली जाईल. यासाठी उमेदवारांनी सारथीच्या उपरोक्त संकेतस्थळावरील सूचनाफ़लक वेळोवेळी पहावे.

Ashokkakade

**श्री अशोक काकडे. (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक,सारथी, पुणे**